# रसरंग

डॉ. बाळासाहेब पुरोहित हे नागपूरच्या सांगीतिक वर्तुळातले महत्त्वाचे नाव . मैफिलीचे गायक, संगीताचे गाढे अभ्यासक, बंदिशकार, संगीतविषयक मौलिक लेखन करणारे विचारवंत, शिष्याला तळमळीने शिकवणारे गुरु, हाडाचे शिक्षक, असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. डिसेम्बर२०२० अखेरीस त्यांचे निधन झाले .एकोणनव्वद वर्षाचे निरोगी, कार्यमग्न आणि संपन्न आयुष्य ते जगले. सरांचा जन्म १९३२ सालचा चन्द्रपुरातला. वडील अण्णासाहेब तसेच चतुर संगीत विद्यालयाचे निस्ताने मास्तर हे त्यांचे गुरु. पुढे मामेभाऊ श्रीकांत बाकरे यांच्यामुळे त्यांना उस्ताद अमीरखान यांचा सहवास लाभला आणि मनोमन ते शागीर्द बनले. गंडाबंधनाचे रीतसर सोपस्कार झाले नसले तरी एकलव्याच्या निष्ठेने बाळासाहेबांनी गुरूंची गायकी आत्मसात केली.शब्दोच्चारण, आवाजाची जात, फेक अनुसरली. किराणा किंवा इंदोर घराण्याची मूल्ये बाळासाहेबांच्या गायकीतून जाणवायची .

डॉ. पुरोहित यांना देशभरात विविध ठिकाणी मानाच्या संमेलनांमध्ये नागपूरचा झेंडा फडकवला. पुण्यातल्या सवाई गंधर्व महोत्सवासाठी भीमसेन जोशींनी तर गंगुबाई हंगल यांनी कुंदगोळच्या सवाई गंधर्व महोत्सवात त्यांना गायला बोलवले .सांगीतिक आयुष्यातले सर्वोच्च मानाचे हे क्षण सरांनी बंदिशीतून सजवले. किराणा घराण्याच्या पुरुष गायकांची नावे गुंफून अडाणा रागात “तान कापतान जगमे बंदे फते अली” अशी बंदिश बांधली तेव्हापासून भीमसेनजी बाळासाहेबांना ‘तान कपतान’ संबोधायला लागले हे सांगताना सरांना अभिमान वाटायचा ,कृतकृत्यता जाणवायची.

‘सप्तक’,५५ - वसंत नगर, नागपूर हा त्यांचा पत्ता होता.. हिरव्यागार वनराईने वेढलेल्या वसंत नगरात ‘सप्तक’ हे सुरांचे घर आहे. गेली पन्नास-

पंचावन्न वर्षं सर त्याच  घरात रहात होते. त्या घरातून रोज पहाटेचा रियाझ ऐकू यायचा. सकाळचे भैरव ,तोडी , दुपारचा सारंग, संध्याकाळी मारवा, पुरिया आणि रात्री दरबारी, मालकौंस सारख्या रागाच्या स्वरांनी हा परिसर आणि तिथले लोक संस्कारित व्हायचे.

डॉ बाळासाहेब पुरोहित हे वृत्तीने कलाकार होते. तोच विचार, तोच ध्यास, तोच आचार असायचा. सतत मनन-चिंतन-श्रवण, गायन आणि वाचन-लेखन सुरू असायचे . मल्हारचे- सारंगचे- कानड्याचे- कंसाचे अनेक प्रकार एकापुढे सौंदर्यपूर्ण तऱ्हेने एक गाऊन दाखविणे, अनवट जोड राग गाणे ,एखाद्या रागाला किंवा बंदिशीला विविध घराण्यांची डूब देणे यात  मनापासून रमायचे. महत्त्वाचे  म्हणजे एवढे विश्लेषण आणि चिकित्सा केली तरी ते रागाचा आणि संगीताचा  आत्मा मात्र हरवू देत नसत. विश्लेषणाऐवजी विच्छेदन होणार नाही याची काळजी घेत. त्यांच्या रागाचर्चांना मैफिलीतल्या गायनाच्या अनुभवांचे पाठबळ लाभलेले असायचे. त्यांच्या बंदिशीमध्ये सांगीतिक आशय व सर्वसामान्यांना आकृष्ट करणारा शब्दांचा खेळही असायचा .‘रसरंग’ या टोपणनावाने ते बंदिशी रचत .त्यांच्या बंदिशी तालात जखडलेल्या नसतात. सैल मोकळ्या बांधणीच्या असतात. ‘मन के पंछी भये बावरे’ म्हणताना हा पंछी खरोखरच मोकळ्या हवेत मुक्तपणे विहरतोय असे वाटायचे. लांबची स्वरांतरे काबीज करतांना त्यातल्या मिती एकसंध होऊन येत . अतिविलंबित आलापी व चमत्कृतीची तान यांना सरगमने सांधले जायचे. बंदिशी रागाला वळसा घालत रागाचे नेमके स्वरप्रदेश शोधत . एका रागातून दुसऱ्या रागात सहजपणे जाऊन ते श्रोत्याला चकित करीत . बंदिशीत अडकवून न ठेवता गायकाला मनसोक्त रमू देणाऱ्या या बंदिशीतून स्वरप्रदेशातल्या किराना घराण्याची मूल्ये प्रकटत.

१९९२ साली नागपूरच्या मॉरीस कॉलेजच्या संगीत विभागातून निवृत्त झाले.(म्हणजेच नागपूर महाविद्यालय अथवा वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था )कॉलेजात तेव्हा पं प्रभाकरराव व श्यामसुंदर खर्डेनवीस होते, ठुमरीचे बादशहा असलेले राजाभाऊ कोगजे होते, तारशहनाई वादक बाबासाहेब देशपांडे होते, निर्मलाताई केळकर, मीना राव होत्या. तबलावादक प्रल्हाद भजनी सर, प्रभाकर पिल्ले, प्रभाकर देसाई असे सगळेच नावाजलेले चोखंदळ लोक होते. वर्ग संपले की विभागात संगीताची मैफिल रंगायची यामध्ये इतरही विभागांचे प्राध्यापक सामील होत. पुरोहित सर वर्ग संपल्यावर गुणी विद्यार्थ्यांना खाऊ घालून पुन्हा रियाझाला बसवायचे असे तेव्हाचे विद्यार्थी आवर्जून सांगतात. सरांना क्रियात्मक पक्षाबरोबरच संगीताच्या शास्त्र पक्षातही खूप आस्था होती. नियतकालिकांमधून त्यांचे अभ्यासपूर्ण लेख येत . त्यांचे मौलिक लेखन 'हिंदुस्थानी संगीताची मूलतत्त्वे व सिद्धांत' या पुस्तकातून प्रकाशित झाले आहे. 'तानारीरी' या नाटकातली भूमिका व त्याचे वैशिष्ट्यपूर्ण संगीत दिग्दर्शन हा त्यांचा आणखी एक पैलू होता .

पुरोहित सर आणि काकू दोघेही खाणे व खाऊ घालणे या दोन्हीत मोकळे होते .त्यांच्या घरी गेल्यावर "या...." असं स्वागत व्हायचं. 'आज कुठे वाट चुकलात?" असा पुरोहित काकूंचा 'सिक्युरिटी चेक' झाल्यावरच मग घरात जायला मिळायचं. समोरच्या सोफ्याच्या खोलीत तुम्हाला बसवलंय की आतल्या टीव्हीच्या खोलीत बसवलंय यावर तुम्ही त्यांच्यासाठी 'आम'दार आहात की 'खास'दार असा तुमचा दर्जा ठरायचा . सरांच्या व्यवहारातल्या कच्च्या व्यक्तिमत्वाच्या मागे काकू खंबीरपणे उभ्या असायच्या. सर संकोची-मितभाषी तर काकू स्पष्टवक्ता. लोकांना कडक वाटत. पण खरं सांगायचं तर त्या बाहेरून काटे पण आतून गोड रसाळ गरे असलेला 'फणस' होता. आम्ही सर्व शिष्य आणि विद्यार्थ्यांनी त्यांचा हा मृदू प्रेमळ

स्वभाव अनेकदा अनुभवला. काकू मुख्याध्यापिका होत्या. आदर्श शिक्षिकेचा पुरस्कारही त्यांना मिळाला होता. 'मला काही गाणं कळत नाही' असे म्हणणाऱ्या काकू उत्तम श्रोता होत्या. "इथे मला टीव्ही बघायचा आहे तुम्ही वरच्या घरात जा आणि बसा किती वेळ गायचं ते." असं रोखठोकपणे सांगणाऱ्या काकू हळूच "सरांना त्रास होईल इतकं गाऊ देऊ नका" असा सांगायच्या आणि "अहो पुरोहित जीना फार चढ-उतार करू नका" असं सरांना दरडावयाच्या तेव्हा वरपांगी वीररस असला तरी आत शृंगार आणि भक्तिरस आहे हे संगीतातल्या लोकांना वेगळे सांगायची गरज नसायची. सरांच्या घरात वरच्या मजल्यावरच्या रियाझाच्या खोलीत उजव्या हाताला तीन बटने आहेत. ही तीनही बटने एकत्र दाबायची. एकातून प्रकाश ठेवतो. दुसऱ्यातून पंख्याचा वारा झुळझुळतो आणि तिसऱ्या बटणाने इलेक्ट्रॉनिक तानपुरा आणि सुरपेटी सुरू होऊन आपण स्वरांच्या साम्राज्यात पोहोचतो . सर रियाजच्या या जागेत तासनतास रमत. आयुष्यभराच्या सांगीतिक मेहनतीमुळे वयाच्या नव्वदीच्या आसपास पोहचल्यावरही त्यांची तीक्ष्ण स्मरणशक्ती आणि सुरेल गाता गळा अखेर पर्यंत तलवारीसारखे पारजलेले असायचे.

एक गायक म्हणून गेली तीस पस्तीस वर्षे सरांचे गाणे मी ऐकत होते. . सर माझ्या वडिलांचे वडिलांचे ज्येष्ठ मित्र होते. सरांना आणि काकूंना माझ्याबद्दल वाटत असणारे प्रेम मी अनेकदा अनुभवले आहे. माझ्या लग्नात सरांचे गाणेही झाले होते तेंव्हापासून ते माझे एक हक्काचे घर बनले होते .पुरोहित सर माझे पी एच डी चे मार्गदर्शकही होते. संशोधनाच्या गरजेनुसार प्रात्याक्षिके ,विस्तृत चर्चा, मुक्त वादविवाद चालत. स्वतःच्या मतासाठी मलाही दाखले, पुरावे,स्पष्टीकरणे द्यावी लागत. सर जणू हलवून माझा खुंटा बळकट करून घ्यायचे . सुरवातीला मन्द्रमध्य सप्तकात चालणाऱ्या आमच्या चर्चा तारसप्तकात पोचल्या की काकू मध्यस्थी करीत. याकाळात एक संगीताची अभ्यासक, एक गायक आणि एक व्यक्ती म्हणून

मला सरांचा खूप जवळून परिचय झाला आणि कायमचे ऋणानुबंध जुळले . माझ्या प्रबंधाच्या सादरीकरणाच्या दिवशी त्यांनी आधी देवाजवळ प्रबंध ठेवला, नारळ फोडला आणि काकुंनी चक्क आम्हा गुरुशिष्याच्या जोडीला ओवाळले होते. असे 'भाग्य' फार थोड्यांच्या वाट्याला येते.

नागपूरच्या संगीतक्षेत्रात बाळासाहेब पुरोहितांचे आस्तित्व प्रेरणादायी होते. .त्यांच्या उपस्थितीचा दरारा व प्रेम नागपूरच्या संगीतक्षेत्राला वळण लावीत होते. अशा व्यक्तिमत्त्वाचे आपल्यातून निघून जाणे ही म्हणूनच एक मोठी हानी आहे. कालाय तस्मै नमः!

-साधना शिलेदार